# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १७.०९.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १६/०९/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५६,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१६/०९/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १४.४ लिटर दारू असा एकुण ८,८००/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये

जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१६/०९/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे वसमत शहर ०२,हिंगोली ग्रा.०१ असे ऐकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी असा एकुण १९,३७०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :—दिनांक १६/०९/२०२२ रोजी फिर्यादी विठ्ल पुंजाजी नागरे रा.असोला ता.औढा ना. जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०३.०९.२२ रोजी चे १९:०० ते ०४.०९.२२ रोजी चे ०७:०० वा चे दरम्यान मौजे असोला शिवारातील फिर्यादीचे शेतातील मोकळया जागेत आखाडयावर अज्ञात चोरटयांनी फिर्यादीच्या एक काळया रंगाची व एक भुऱ्या रंगाची अशा दोन गावरान जातीच्या म्हैशी कि.७०,००० रू च्या शेतातील आखाडयावरून चोरून नेल्या म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

**फसवणुक** :—दिनांक १६/०९/२०२२ रोजी फिर्यादी ताईबाई दगडु आयनर वय ५० वर्ष व्य. मेंढपाळ रा.पिपळगाव नाथ ता.मोताळा जि.बुलढाणा यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ४२० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१५.०९.२२ रोजी चे २२:१५ वा चे सुमारास सरकारी दवाखान्या ते पारोळा शिवार येथे अज्ञात आरोपीने फिर्यादी व साक्षीदार यास सरकारी दवाखाना हिंगोली येथुन पारोळा फाटयाच्या जवळ कच्या रस्त्यावर मोटार सायकल ने नेउन अज्ञात आरोपीने आमचा विश्वास संपादन करून सोन्याचे व चांदीचे दागीने एकुण कि. १,६७,००० रू काढुन घेतले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.